I J R S S I S, Vol. VI, Issue (1), January- 2018: 319-324 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# भूमी अधिग्रहण विधेयक–२०१५ व दलित–आदिवासी

**डॉ. गौतम खु. कांबळे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
दीक्षाभूमी, नागपूर
७८८८००२६३० email : gautam14161@gmail.com.

**सारांश :**

प्रस्तुत शोधनिबंध चार भागात विभाजित केला असून त्यापैकी भाग–१ विकास प्रक्रिया व भूमी अधिग्रहण, भाग – २ दलित आदिवासींची जमीनमालकी, भाग – ३ भूमी सुधार कार्यक्रमाची अंमलबजावणी व दलित – आदिवासींचे विस्थापन व भाग – ४ मुल्यांकन. प्रस्तुत शोध निबंधात भूमी अधिग्रहण विधेयक २०१५ च्या सुधारित कायदयामुळे दलित आदिवासी हा वंचित व विस्थापित समाजगट आणखी दुरावस्थेत आल्याचे दिसते असे नमूद केले असून या समाजघटकांना जमीन मालकीच्या संदर्भात अधिक संरक्षित व आश्वस्त करण्याची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. देशातील विकासप्रक्रियेद्वारे अधिक आर्थिक विकास व समन्याची वितरण करण्याच्या दृष्टीने या समाजगटांना वर्तमान काळात अधिक संरक्षित करणे सर्वाधिक प्रासंगिक असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

**की वर्डस्** : भूमी अधिग्रहण, दलित–आदिवासी, विकासप्रक्रिया, जमीन मालकी,

**गृहित तत्वे** :– भूमी अधिग्रहण देशहितासाठी कमी प्रमाणात करण्यात आले आहे. मात्र वर्तमानकाळातील दलित आदिवासींना जमीन मालकी काही प्रमाणात मिळाली आहे.

## प्रस्तावना :–

स्वातंत्र्यानंतर देशात नवीन विकासप्रक्रिया सुरु झाली. या विकासप्रक्रियेत समाजवादाचे वारे वाहू लागले होते. निदान तसे भासविले तरी जात हाते. विकासप्रक्रिया ही अर्थातच ग्रामीण क्षेत्रातील शेतीवरील रोजगाराचा अवास्तव भार कमी करणे व शहरी क्षेत्रातील औद्योगिक विकासाला प्राधान्य देणे या दोन प्रमुख उद्दिष्टांवर काम करु पहात होती. म्हणून तेव्हापासून तर आजपर्यंत आर्थिक विकासाकरीता औद्योगिक विकासाच्या अंतर्गत औद्योगिकरणाचे विविध प्रारुप–स्वरुप हे रोजगाराभिमुख आहे असे सांगितले गेले. या भुमिकेमागील आणखी एक लक्षात येण्यासारखे कारण असे की तेव्हापासून आजपर्यंतची वाढलेली १२५ कोटी लोकसंख्या, तिचे जगण्याचे आधार हे अधिक चिंतेचे विषय होते व तिची 'जमीन सुधार' कार्यक्रमाची आखणीसुध्दा याच अपरिहार्यतेतून केली गेली असे दिसून येते. दलित आदिवासींचे रोजच्या जगण्यातील प्रश्न भूमी अधिग्रहण विधेयकामुळे अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे, असे वाटते.

## विकास प्रक्रिया व भूमी अधिग्रहण :

आर्थिक विकास करायचा असेल तर आधी औद्योगिक विकास व औद्योगिक विकास करायचा झालयास तो देशातील अधिकाधिक अकुशल व अशिक्षित श्रमशक्तीला जास्तितजास्त रोजगार देणारा असला पाहिजे हे धोरण स्विकारणे ही तेव्हाची गरज होती, जी आजही संपलेली नाही. याचे कारण ती आजच्या भारतीय समाजाचीही नितात गरज आहे, अशी नियोजनकर्त्यांची मानसिकता होती व ती निश्चितपणे रास्तच होती. अशावेळी देशात औद्योगिक विकास होण्यासाठी तत्कालिन शासनाने पुढाकार घेतला. देशातील विविध भागात मूलभूत उद्योग टाकण्यासाठी भूमी, श्रम,भांडवल व संघटन या चार उत्पादन घटकांमध्ये भूमी महत्वाची ठरली. म्हणून देशाच्या आर्थिक–औद्योगिक विकासासाठी विविध विकासप्रकल्पांना, रस्ते, सिंचन इ. ची गरज भासू लागली, तेव्हा भूमी अधिग्रहित करण्यासाठी ''लोकांनी देशविकासासाठी त्याग करावा'' या पं. नेहरुंच्या भावनिक आवाहनाला लोकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

अर्थातच समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये उतपादनाची साधने (त्यात जमीनही आलीच) ही शासनाच्या म्हणजे समाजाच्याच मालकीची असतात, तसे सरंक्षण आपल्या राज्यघटनेने दिले आहे. त्यामुळे शासनाला जमीन सहजपणे अधिगहीत करता आली. सन १९९१ नंतर मात्र विकासप्रक्रियेची दिशा बदलू लागली. ती जागतिकीकृत भांडवलशाहीकडे खेचली गेली हे वास्तव आहे. राज्यघटनेत समाजवादी, सार्वभौम गणराज्याचे अस्तित्व जरी आजही नमूद असले तरी प्रत्यक्षात मात्र ते जवळपास संपुष्टात आले आहे. अशावेळी भूमी अधिग्रहण कायदयाच्या धोरणान्वये देशातील संपत्ती किंवा उत्पादनाची साधने ही शासनाच्या मालकीचीच असावीत हा आग्रह संयुक्तिक नाही, असा विचार समोर येवू शकतो. खरे तर हा विरोधाभासच म्हणावा लागेल. प्रसाद बी. के. यांनी जमीन मालकी व विस्थापनाबाबत निरिक्षण नोंदवले, त्यानुसार ''ग्रामीण क्षेत्रातील उद्योगांचे विकेन्द्रीकरण, नव्या रोजगाराची निर्मितीची क्षमता आणि जमीन सुधार आंतरसंबंध यात एकात्मिक बाजूंनी मांडला जाणे आवश्यक ठरते.''[१] सन १९९१ नंतरच्या विकासप्रक्रियेतून असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, तसा भूमीअधिग्रहणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. वर्तमान स्थितीत प्रत्यक्ष सरकारच भूमिअधिग्रहणाच्या नावाखाली 'व्यवसाय' त उतरले आहे. हा व्यवसाय सध्या वरवरच्या पातळीवर दिसत नसला तरी तो आतमध्ये मोठया प्रमाणावर फोफावलेला आहे. मागील साधारणतः चोविस वर्षात देशात सेझ सारख्या नवनवीन उपक्रमांसाठी सरकारने जमीन अधिग्रहीत करणे व ती उद्योजकांच्या माध्यमाने रिअल इस्टेटला विकण्याचे प्रकार सार्वत्रिक होत आहेत. हा व्यवसाय शासनप्रणितच असून तो उद्योजक भांडवलदार व धर्माधिशक्तींच्या हितासाठी काम करु लागला आहे. त्यामुळे हा व्यवसाय देशातील सर्वसामान्य समाजाचा विचार करु शकतच नाही. जमिनीसारखे महत्वाचे उत्पादनसाधन सरकारी यंत्रणा व उद्योजकांना अधिक भांडवल देणारे असले पाहिजे या मानसिकतेतूनच जमीन अधिग्रहणाच्या प्रक्रियेकडे पाहिले जात आहे. जे सामान्यांकरीता लाभदायक नाहीच. यासंबंधातील ठळक आकडेवारी बरेच काही सांगून जाते. उदा. अंबानीसारख्या उद्योजकाकडे देशातील सुमारे २७,५०० एकर जमीन तर आधुनिक राष्ट्रसंत झालेल्या रामदेवबाबांकडे सुमारे २७,२०० एकर जमीन ट्रस्टच्या माध्यमाने एकवटलेली दिसून येते. हे विषमता वाढविणारे नाही का ? राज्यकर्ते व सनदी अधिकारीसुध्दा या खेळात कुठेही मागे दिसत नाहीत, उदा. दीड–दीडशे एकरांच्या शासनाच्या जमिनी राज्यकर्त्यांनी लीजवर घेऊन आपले 'शैक्षणिक' व औद्योगिक साम्राज्य दिमाखाने उभे केले आहे. एक सनदी अधिकारी आपल्या शासनसेवेच्या शेवटी सुमारे ३०० कोटींचे भांडवल सरासरीने उभे करु शकतो, हे वास्तव सार्वजनिक व प्रतिष्ठेचे होत आहे. हे आणखी चिंतनीय आहे. अशा परिस्थितीत जमिनीतून भांडवल उपसण्यासाठी जमिन अधिग्रहणाच्या अटी / तरतुदी या देशातील उद्योजक, भांडवलदार, राज्यकर्ते, कार्पोरेट सेक्टर्स, धर्मादाय संस्था व सनदी अधिकाऱ्यांच्या अंतस्थ हिताच्या करुन घेण्यासाठी जे पंचवीस वर्षापासूनचे प्रयत्न सुरु आहेत, त्याचे प्रतिबिंब नवीन भूमीअधिग्रहण विधेयकामध्ये दिसणे साहजिक आहे. खरे तर या भूमीअधिग्रहण विधेयकाकडे युपीए व एनडीए या पंचवीस वर्षातील दोन्ही सरकारांची पाहण्याची दृष्टी जवळपास सारखीच दिसून येते. त्यातही एनडीएच्या 'मोदी' सरकारजवळ स्वतःचे आपले एक

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

खास तत्वज्ञान असल्यामुळे (जे युपीए सरकाजवळ नाही) या विधेयकाची दिशा अधिक व्यापार भांडवल धर्जिणी व त्याचवेळी सर्वसामान्यांना अधिक दडपणारी असणे अभिप्रेतच आहे. यात महत्वाचे असे की या भूमीअधिग्रहण विधेयकामध्ये जमिनीच्या मालकीच्या विकेन्द्रीकरणाचे तत्व नाकारले गेले असून श्रीमंत, कार्पोरेट, धर्मादाय, शैक्षणिक संस्थांकडे जमिनीचे केन्द्रीकरण कसे करता येईल याचे चिंतन समाविष्ट आहे. शेवटी 'आम्ही कार्पोरेट सेक्टरला जमीन देणार नाही' हे त्यांना जाहीरपणे सांगावे लागणे हा या विधेयकाला जनरेटयाच्या असणाऱ्या विराधाचा परिणाम आहे व दुसरे म्हणजे ती सरकारची अगतिकता आहे. अंतस्थ हेतू मात्र वेगळाच आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

**दलित–आदिवासींची जमीन मालकी :**

जमीनमालकीसंदर्भात दलित आदिवासींचा विचार केल्यास या दोन्ही समाजगटांचे बऱ्याच प्रमाणात सारखे व काही प्रमाणत वेगवेगळे चित्र उभे राहते. दलित – आदिवासी यांची वर्तमान स्थितीची कारणे नमूद करतांना डॉ. बी. बी. मोहंती म्हणतात, की नियोजनकाळात शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी फारसे परिश्रम घेतले गेले नाही. याचा प्रतिकुल परिणाम ग्रामीण क्षेत्रातील अनुसचित जाती व अनुसूचित जातीवर....ग्रामीण क्षेत्रातील विकास प्रक्रियेला चालना देऊ शकणाऱ्या 'जमीन सुधार कार्यक्रमाच्या' अंमलबजावणीवर देखील झाला असे दिसते.[२] राष्ट्रीय श्रम आयोगाच्या २००२ च्या अहवालानूसार, "आदिवासी व इतर भटक्या विमुक्त जमाती जे जंगलावर पूर्णत: अवलंबून आहेत, ते आपला उदरनिर्वाह एकतर हरवून बसले आहेत किंवा बाहेर फेकले गेले आहेत."[३] तसेही संपूर्ण भारतीय समाजाचे एकत्रित चित्र बघता असे दिसते की, जमीन ही संपत्ती प्रमाणेच काही थोडया संपन्न लोकांजवळ एकवटलेली आहे. या सदंर्भातील आकडेवारी हे स्पष्ट करते की, देशातील २ टक्के लोकांजवळ देशातील ५० टक्के जमीन व ९८ टक्के लोकांजवळ केवळ ५० टक्के जमीनमालकी आहे. जमिनीच्या या विषमवाटणीचा बळी दलित, आदिवासी हा बहिष्कृत व साधनहीन समाजगट आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, दलितांमधील सीमांत शेतकऱ्यांचे (अल्पभुधारक) प्रमाण सुमारे ७५ टक्के असून त्यातील ५६ टक्के कुंटूबाकडे एक एकरापेक्षही कमी जमीन आहे. यापैकी ४७.५ टक्के कुंटुबांकडे अर्ध्या एकरापेक्षाही कमी जमीन आहे. त्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७० टक्के प्रमाण भूमिहीन शेतमजूरांचे आहे. याचा अर्थ असा होतो की दलितांजवळ फारच अत्यंल्प उत्पादनाची साधने आहेत. त्यांचा रोजगार देखील फारच अस्थिर व अल्प उत्पन्न देणारा आहे. ग्रामीण क्षेत्रात त्यांच्याजवळील संपत्ती (जमिनीच्या रुपातील) अत्यंत नगण्य स्वरुपाचीच आहे. सामाजिक न्याय व आर्थिक समानतेचे समर्थन करण्यासाठी जमीन सुधाराची गरज शेतीसाठी स्पष्ट करतांना नरेश प्रसाद यादव म्हणतात, "वास्तविकत: सामाजिक न्याय व आर्थिक समानतेच्या समर्थनार्थ कमाल भूधारणेच्या पुनर्वितरणाचा पैलू फारच महत्वाचा ठरतो."[४] त्यातही शेतीक्षेत्रातील मशागतीसाठी लागणाऱ्या सुविधांबाबत मागील वीस वर्षातील बी–बियाणांपासून तर बैलजोडीपर्यंच्या वाढत्या महागाईमुळे तो आपली शेती चांगल्याप्रकारे कसूच शकत नाही. त्यातही शेतकरी म्हणून तो अल्पकालीनच आहे. कारण त्याला उदरनिर्वाहासाठी स्वत:ची शेती सांभाळून दुसऱ्याच्या शेतावर

I J R S S I S, Vol. VI, Issue (1) January- 2018: 319-324 ISSN 2347 – 8268
INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

पुर्णवेळ म्हणून राबावे लागते. त्यामुळे वाढत्या महागाईत व अस्थिर परिस्थितीत त्याची शेती कसण्याची मनोवृत्ती (तीव्र इच्छा असूनही) कमी–कमी होत आहे. मागील पंधरा वर्षात त्याचे शेती विकण्याचे प्रमाण म्हणूनच इतर समाजगटांच्या तुलनेत वाढलेले दिसत आहे. जागतिकीकरणाचा मागील पंचवीस वर्षाचा रेटा या सगळया स्थितीला कारणीभूत ठरतो. अशावेळी भूमीग्रहण विधेयक अशा साधनहीन व वंचित समाजाला अधिक दिलासा देणारे असावे, ही रास्त अपेक्षा आहे. मात्र या विधेयकाचे प्रसारित झालेले स्वरुप पाहता ही अपेक्षा पूर्ण होण्याचे कुठलेच चिन्ह दिसत नाही. स्वामीनाथन समितीने २००७ मध्ये जमिन मालकीची अपरिहार्यता दलित–आदिवासीसाठी स्पष्ट केली, समितीच्या मते, '' जमीन सुधारातील न संपलेला मद्दा पूर्ण करणे तसेच एकात्मिक संपत्ती व कृषी सुधार सुरु करण्याची नितांत गरज आहे.''[५]

आदिवासींजवळ दलितापेक्षा जमीनीची मालकी अधिक प्रमाणात आहे हे खरे आहे. मात्र मागील साठ पासष्ट वर्षात देशातील विविध विकासप्रकल्पांमध्ये या समाजगटाची जमीन सर्वाधिक प्रमाणात गेलेली आहे. सुमारे पाच कोटी कुंटूबे या विभिन्न प्रकल्पांमुळे विस्थापित झाली आहेत. त्यांच्याजवळ दलितांच्या तुलनेत जमीनमालकी अधिक असली तरी ती आधुनिक स्वरुपात कसायला त्यांच्याजवळ भांडवल, कौशल्य व शिक्षण यांचा प्रचंड अभाव आहे, असे आढळते. त्यातही आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींना घेता येणार नाही, ही जी संरक्षणात्मक तरतूद त्यांना कायदयाद्वारे होती (यामुळे त्यांच्या जमिनी आजपर्यंत सुरक्षित राहिल्या आहेत) ती आता बऱ्याच प्रमाणात सैल होण्याची चिन्हे दिसत आहेत. अशा स्थितीत भविष्यात त्यांचे जमिनी विकण्याचे प्रमाण अधिक वेगाने वाढेल, हे निश्चित आहे. दलित आदिवासींच्या बाबतीत एक विरोधाभास पुढच्या काळात पुन्हा नव्याने असा दिसणार आहे की, त्यांच्याजवळ जमीन कसण्याशिवायचे दुसरे कौशल्य–कसब नाही, मात्र त्यांच्याच जमिनी अधिक वेगाने त्यांच्यापासून निसटत जाणार. या विरोधाभासातून त्यांची केवळ भूमिहीनताच वाढणार आहे असे नसून त्यांच्यापासून संपत्ती, रोजगार हे सगळे वेगाने दूर जातील, दारिद्रय आणखी घट्ट चिकटून बसेल अशी स्थिती येवू शकेल. यासाठी जमीन सुधाराचे स्वरुप साधनहीनभिमुख करणे श्रेयस्कर ठरेल असे डॉ. पी. सी. जोशी यांना वाटते, त्यांच्या मते, ''कृषी संरचनेतील बदल दोन मार्गानेच शक्य आहे. १) सामाजिक आर्थिक प्रक्रियेमध्ये सत्तेच्या विच्छेदनाची परिणती व २) कृषी क्षेत्रांत सरकारचा प्रत्यक्ष हस्तक्षेप.''[६]

वास्तविक पाहता मागील साठ–पासष्ठ वर्षात ग्रामीण क्षेत्रामध्ये भूमी सुधार कार्यक्रम निष्ठेने व प्रभावीपणे राबविला असता तर दलित–आदिवासींची स्थिती यापेक्षा तरी निश्चितच चांगली राहिली असती. शेती कसण्याची त्यांची मनोवृत्ती वाढीस लागली असती. त्यांच्या गरिबी निर्मुलनाचा तो एक अत्यंत प्रभावी मार्ग ठरु शकला असता. ''विकास कार्यक्रमाची सार्थकता व यश डॉ. अमर्त्य सेन व जीन ड्रीज स्पष्ट करतांना म्हणतात'', भारतात जमिनीचे अधिकार, स्वास्थसेवा, सार्वजनिक वितरण व्यवस्था, जलपूर्ती, खत ; अनुदाने तथा शाळांमध्ये मुलांना पाठविणे इत्यादी अशी पाऊले आहेत की जी भारतात फारच सार्थक व यशस्वी होऊ शकतात.''[७] मात्र भूमी सुधार कार्यक्रम केवळ भूमी वितरणापुरताच सीमित ठेवला गेला. त्याच्या पुढचे सारे

I J R S S I S, Vol. VI, Issue (1) January- 2018: **319-324** ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

महत्वाचे टप्पे कधी प्रत्यक्षात अस्तित्वातच आले नाहीत, हीच वस्तुस्थिती आहे. दोन्ही सरकारांच्या मागील पंचवीस वर्षाच्या राजवटीत हा कार्यक्रम पुर्णपणे 'मृत मुद्दा' म्हणूनच समजला गेला. व सपंत्तीचे केन्द्रीकरण कार्पोरेट सेक्टरकडे भांडवलदारांकडे कसे होईल याचा कसोशीने प्रयत्न केला गेला. त्यामुळे दलित–आदिवासींची स्थिती आणखी गंभीर होत आहे, अन्नधान्य सुरक्षा दिल्यामुळे त्यांची उपासमार तूर्त थांबली आहे व वाढत्या व्यसनाधिनतेमुळे त्याची गंभीर स्थिती त्याला फारशी जाणवत नाही हे सुध्दा खरे अहे. अशावेळी येत असलेले नवीन भूमीअधिग्रहण विधेयक खरे तर या समाजगटांना अधिक न्याय देणारे, त्यांची स्थिती उंचावणारे कसे राहील याचा प्राधान्याने विचार करणारे असले पाहिजे, यादृष्टीने संपादनानंतर पुनर्वसनाचा विचार करतांना 'जमिनीच्या बदल्यात जमीन' व कुंटबातील निदान एकाला तरी स्थायी रोजगार देण्याबाबतची तरतूद या विधेयकात असायला पाहिजे. पण तसे कुठेच दिसत नाही. या विधेयकाचे समर्थन करतांना प्रधानमंत्री व त्यांचे समर्थक अशी जाहिरात करतात की या विधेयकामुळे देशात सुमारे तीस कोटी ग्रामीण लोकांना रोजगार मिळणार आहे. मात्र तो कसा मिळेल ? त्याचे स्वरुप कसे राहील ? अर्थात ते स्थायी स्वरुपाचे असतील की अस्थायी स्वरुपाचे असतील ? याविषयीचे कुठलेही स्पष्टीकरण त्यांच्या वक्तव्यात दिसून येत नाही. अशा स्थितीत हे विधेयक सर्वसामान्य वंचित–शोषित समाजगटांच्या बाजूने करुन घेण्यासाठी आवश्यक जागरुकता तसेच आंदोलनाचा जनरेटा या सगळया घटनात्मक मार्गाचा अवलंब करण्याची नितांत गरज आहे, असे वाटते.

**मूल्यांकन :**

भूमी अधिग्रहण विधेयकाद्वारे मागील काही वर्षापासून देशातील दलित–आदिवासींना भूमीपासून वंचित करण्याचे प्रमाण वाढत आहे. असे दृष्टीस पडते. त्यांचे बरोजगारीचे प्रमाण इतर समाजगटापेक्षा अधिक असण्याचे एक कारण हे त्यांचे जमिनीबाबतचे विस्थापन हे आहे. त्यांना ग्रामीण व शहरी क्षेत्रात पर्यायी रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. या कायद्यान्वये झालेले त्यांचे विस्थापन दूर करण्यासाठी सरकारने आपल्या धोरण–कृतिकार्यक्रमात सकारात्मक बदल करण्याची गरज आहे. याकरिता दलित व आदिवासी यांना त्यांच्या रोजगाराच्या अपेक्षित गरजा समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची व त्याप्रमाणे आपल्या कृतिकार्यक्रम व योजनामध्ये अपेक्षित बदल करणे इष्ट होईल.

**संदर्भ टीपा :–**

१) प्रसाद बी. के. (संपा.) ''इंडियाज डेव्हलपमेंट अजेंडा इश्यूज, "लेंजेस ॲण्ड पॉलिसीन'' व्हॉल्यूम–१, इंस्टिटयूट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट लखनऊ ॲण्ड अमोल पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, न्यु. दिल्ली/१०००२ इंडिया, २००५, पृ. १५८

२) मोहंती बी. बी., ''लॅंड डिस्ट्रब्युशन अभंग शेडयूल्ड कास्ट्स ॲण्ड शेडयूल्ड ट्राईब्स, इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल वीकली'', ऑक्टो २००१, पृ. ३८६३

३) राष्ट्रीय श्रम आयोगाचा अहवाल २००२, ''ॲकेडेमिक फॉऊडेशन, इकॉनॉमिका इंडिया'', इन्फो सर्व्हिसेस, ४७७२१७३, भरत राम रोड, २३ अंसारी रोड, दरिया गंज, न्यु दिल्ली, २००३, पृ. ११९, परि ३ व ४

४) यादव, नरेश प्रसाद, ''लॅंड रिफॉर्म्स ॲड

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट'', कॉमनवेल्थ पब्लिशर्स, ४३७८/४१३, असांरी रोड, मुरारीलाल स्ट्रीट, न्यू दिल्ली, १९८१, पृ. १६५ परि–१

५) स्वामीनाथन, एम. एस. ''सर्व्हिंग फॉर्मर्स ॲड सेव्हिंग फॉर्मर्स फिप्थ ॲड फायनल रिपोर्ट'' जय किसान रिव्हाईन्ड ड्रॉप्ट नॅशनल कतिशन ऑन फॉर्मर्स–गव्हर्नमेंट ऑफ इंडिया मिनीस्ट्री ऑफ एग्रिकचर नॅशनल कमिशन ऑन फॉर्मर्स; ४ ऑक्टो, २००६, पृ. ४

६) जोशी, पी. सी., ''लॅंड रिफॉर्म्स इन इंडिया–ट्रेंड्स ॲण्ड पर्सपेक्टिव्हज'', अलाईड पब्लिशर्स, न्यु दिल्ली, १९७५, पृ. ५७

७) सेन अमर्त्य व ड्रीज जीन ''इंडिया इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ॲड सोशल अपॉर्च्युनिटी, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, हिंदी अनुवाद भवानी शंकर बागला,: राजपाल ॲण्ड सन्स ; (प्रथम संस्करण); जानेवारी २०००), कश्मिरी गेट, दिल्ली, १९९३ पृ. ९८, परि–२

******